बौद्ध पूजा पाठ

डॉ. बाबासाहेब आंबेडकर

बौध्द पूजा पाठ

डॉ.भी.रा.आंबेडकर

भारतीय बौद्ध जन समिती पुस्तक माला, पुष्प 1 ले

आभार : भारतीय बौद्ध जन समिती

: प्रकाशन सहयोग :

इंडियन बुद्धिस्ट कौन्सील, भारतीय बौद्ध परिषद

शांतीवन चिचोली

टिप : महाराष्ट्र शासनाद्वारे प्रकाशित 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर भाषणे व लेखन-खंड 16' मधिल पान क्र. 728 ते 743 वर 'बौद्ध पूजापाठ' हे पूस्तक प्रकाशित करण्यात आले आहे. ते पुस्तक जसेच्या-तसे पुर्नमुद्रित करून प्रकाशित केले आहे.

- नागपूर
- 3 मे 2018

BOUDDHA POOJA PATHA

बौध्द पूजा पाठ

डॉ. भी. रा. आंबेडकर

भारतीय बौध्दजन समिति पुस्तकमाला
पुष्प १ लें

प्रथम प्रकाशन : वि. रा. रणपिसे, ८९/३, शिवाजी नगर, पुणें
भारतीय बौध्द जन समिति, ९१५६ किं. ८ आणे (५० पैसे)

प्रस्तावना

बौध्दधर्माच्या प्रसाराबद्दल लोकांमध्यें ज्या दिवसापासून आतुरता उत्पन्न झाली आहे त्या दिवसापासून बौध्दधर्म म्हणजे काय, व त्याचें वाङ्मय काय आहे, व कोठें काय मिळते, यासंबधानें भारतीय जनतेमध्यें अतिशय मोठे कुतुहल दिसून येते.

कांहीं वर्ग कुतुहलाच्या मर्यादेपलिकडे गेलेले दिसतात. त्यांना बौध्द धर्माच्या वाङ्मयापेक्षा बौध्दधर्मांत पूजापाठ कशाप्रकारें होते, हें जाणून घेण्याचे एक वेडच लागलें आहे. आम्हांला बौध्दधर्माचा पूजापाठ कसा असतो यासंबंधीं कांहींतरी वाङ्मय द्या, असा सारखा तगादा लागून राहिला आहे. माझ्या शारीरिक अस्वस्थतेमुळें त्यांची जिज्ञासा पुरी करणे आतापर्यंत मला शक्य झालें नाहीं. तशांत बौध्दधर्मांतील तत्त्वज्ञानापेक्षां बौद्धधर्मांतील पूजापाठ याचा या देशांत अगदीच लोप झाला आहे. त्या कारणांमुळें या प्रश्नासंबंधीं बौध्दर्धांतील पूजापध्दति व त्यासंबंधीं गाथा कोठेंच उपलब्ध नाहीं. त्या फक्त ज्या देशामध्यें बौध्दधर्म आज प्रचलित आहे, तेथेंच मिळू शकतात.

१९५० सालीं मी सिलोनला गेलो असतांना त्या काळांत याच विषयावर भर देऊन या गाथा मी संग्रहित केल्या व माझें मित्र श्री. गुणतिलके यांना गावयास लावून त्याचे रेकार्ड बनवलें. येथें आल्यानंतर कांहीं बौध्द भिक्षूंच्या महाय्यानें या गाथामध्यें भर टाकली. आज बहुतेक सर्व गाथा या पुस्तकांत एकत्रित झाल्या आहेत, असें म्हणावयास हरकत नाहीं. येथील महाराष्ट्रीय लोकांना या गाथा समजण्यास सुलभ जाव्या म्हणून पाली गाथेचे मराठी भाषांतर एका वाजूस दिलें आहे.

हें पुस्तक “भारतीय बौध्द जन समिती” हिच्या तर्फे प्रसिध्द केलें जात आहे. या पुस्तकावरील माझें सर्व हक्क त्या समितीस दिले आहेत. जो कोणी या हक्कांचे कोणत्याहि तऱ्हेने उल्लंघन करील त्याच्यावर कायदेशीर इलाज केला जाईल, असा इशारा देण्याची आवश्यकता वाटतें. कारण या देशामध्यें असें लुच्चे लोक आहेत कीं, ते कानामात्रा बदलून दुसऱ्यांचें पुस्तक आपलेंच आहे म्हणून प्रसिध्द करतात. यानंतर “बौध्द संस्कार पाठ” या नांवाचें दुसरें पुस्तक याच मालेतर्फे प्रसिध्द केलें जाईल.

डॉ. भी. रा. आंबेडकर

२६, अलिपूर रोड,
सिव्हिल लाईन्स, दिल्ली.
दि. २४-२-५६

-: अनुक्रमणिका :-

	पाठ				पृष्ठ
१.	सरणत्तयं	...	...	...	२
२.	पंञ्चसीलानि	...	...	...	३
३.	बुध्द वन्दना	...	...	...	४
४.	धम्म वन्दना	...	...	...	५
५.	संघ वन्दना	...	...	...	६
६.	पूजा	...	...	...	७
७.	सब्बसुखगाथा	...	...	...	८
८.	द्दम्मपालनगाथा	...	...	...	९
९.	रतन सुत्त	...	...	...	१0
१०.	जप	...	...	...	१३

मराठी भाषांतर –	**मूळ पाली–**
त्या भगवान बुध्दाला माझे नमन असो, जो अर्हत (जीवन मुक्त) सम्यक (संपूर्ण) सम्बुध्द (जागृत) आहे	नमो तस्स भगवतो अरहतो सम्मासम्बुद्धस्स ।
त्या भगवान बुध्दाला माझे नमन असो, जो अर्हत (जीवन मुक्त) सम्यक (संपूर्ण) सम्बुध्द (जागृत) आहे	नमो तस्स भगवतो अरहतो सम्मासम्बुद्धस्स ।
त्या भगवान बुध्दाला माझे नमन असो, जो अर्हत (जीवन मुक्त) सम्यक (संपूर्ण) सम्बुध्द (जागृत) आहे	नमो तस्स भगवतो अरहतो सम्मासम्बुद्धस्स ।

तीन अनुसरणें

मी बुद्धाला अनुसरतो
मी त्याच्या धर्माला अनुसरतो
मी त्याच्या संघाला अनुसरतो

दुसन्यादा मी बुद्धाला अनुसरतो
दुसन्यांदा मी त्याच्या धर्माला अनुसरतो
दुसन्यांदा मी त्याच्या संघाला अनुसरतो

तिसन्यांदा भी बुद्धाला अनुसरतो
तिसन्यांदा मी त्याच्या धर्माला अनुसरतो
तिसन्यांदा मी त्याच्या संघाला अनुसरतो.

सरणत्तयं

बुद्धं सरणं गच्छामि ।।
धम्मं सरणं गच्छामि ।।
संघं सरणं गच्छामि ।।

दुतियम्पि, बुद्धं सरणं गच्छामि ।।
दुतियम्पि, धम्मं सरणं गच्छामि ।।
दुतियम्पि, संघं सरणं गच्छामि ।।

ततियम्पि, बुद्धं सरणं गच्छामि ।।
ततियम्पि, धम्मं सरणं गच्छामि ।।
ततियम्पि, संघं सरणं गच्छामि ।।

पांच शीलें	पञ्चसीलानि।
१. मी जीवहिंसेपासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करतों.	पाणातिपाता वेरमणी-सिक्खापदं समादियामि ।।१।।
२. मी चोरी करण्यापासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करतों.	अदिन्नादाना वेरमणी-सिक्खापदं समादियामि ।।२।।
३. मी कामवासनेच्या अनाचारापासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करतों.	कामेसु मिच्छाचारा बेरमणी - सिक्खापदं समादियामि ।।३।।
4. मी खोटें बोलण्यापासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करतों.	मुसावादा वेरमणी-सिक्खापदं समादियामि ।।४।।
५. मी मद्य, मादक तसेंच इतर सर्व मोहांत पाडणान्या मादक वस्तूंच्या सेवनापासून अलिप्त राहण्याची प्रतिज्ञा करतों.	सुरा-मेरय-मज्ज-पमादट्ठाना वेरमणी-सिक्खापदं समादियामि ।।५।।

तीन रत्नांना वंदन
१. बुध्वास

अर्हत् (जीवन्मुक्त) सम्यक् (संपुर्ण) सम्बुद्ध (जागृत) विद्या व आचरणांनी युक्त, सुगति ज्याने प्राप्त केलेली आहे. सर्वश्रेष्ठ, दमनशील पुरूषांचा सारथि व आधार देणारा देव व मनुष्य वाचा गुरू, असा भगवान् बुध्द आहे.

अशा या बुध्द भगबंवाबे जन्मभर अनुसरण करण्याचा मी निर्धार करीत आहे.

मला दुसम्या कोणाचाही आसरा नाहीं, फक्त बुध्द माझा सर्वश्रेष्ठ आधार आहे. ह्या सत्य उच्चारानें माझें जय मंगल होवो ।।१।।

बुध्दाच्या पवित्र चरणधुळीला मस्तक वांकवून भी वंदन करतों.
बुध्दाच्यासंबंधी माझ्या हातून कांहीं दोष घडला असला तर त्याबद्दल तो बुध्द भगवान मला क्षमा करो ।।२।।

ह्या लोकीं निरनिराळया प्रकारचीं जीं अनेक रत्नें आहेत, त्यापैकी कशानेंही बुध्दाची बरोबरी होणार नाहीं. त्या रत्नानें माझें कल्याण होवो ।।३।।

ज्यानें (ज्ञानप्राप्त झालेल्या) पूज्य बोधिवृक्षाखाली बसून मार (कामदेव) ह्याचा त्याच्या अफाट सेनेसह पराभव केला, अनंत ज्ञान प्राप्त करून ज्यानें बुध्दत्व प्राप्त करून घेतलें, जो सर्व जगांत श्रेष्ठ अशा बुध्दाला भी नमस्कार करतों ।।४।।

तिरतन - वन्दना
१. बुध्द वन्दना

इतिपि सो भगवा अरहं, सम्मासन्बुध्दो, विज्जा - चरण सम्पन्नो, सुगतो, लोकविदू, अनुत्तरो, पुरिस-दम्मसारथी, सत्था देव-मनुस्सानं, बुध्दो भगवा' ति ।

बुध्दं याव जीवितं सरणं अच्छामि

नत्थि मे सरणं अञ्ञं, बुध्दो मे सरणं बरं ।
एतेन सच्चवज्जेन, होतु मे जय मंगलं ।।१।।

उत्तमंगेन वन्दे' हे, पादपंसु वरूत्तमं
बुध्दे यो खलितो दोसो, बुध्दो खमतु तं ममं ।।२।।

यं किञ्चि रतनं लोके, विज्जति विविधा पुथु ।
रतनं बुध्दसमं नत्थि, तस्मा सोत्थि भवन्तु मे ।।३।।

यो सन्निसिन्नो वरबोधिमूले, मारं ससेनं महतिं विजेत्वा ।
संबोधिमागच्छि अनंतञाणो, लोकुत्तमो तं पणमामि बुध्दं ।।४।।

धर्म वंदना

२ धम्म - वन्दना

भगवंतानें ज्या धर्मांचा सुंदर उपदेश केला, ज्याचें सत्यत्व येथेंच डोळ्यांसमोर पाहता येतें. जो धर्म आपलें फळ ताबडतोब देतो. कोणीही ज्याचा अनुभव घ्यावा, जो निर्वाणाकडे घेऊन जातो हा सिध्दांत विज्ञानांच्याद्वारे स्वतः अनुभवून पाहतां येतो ॥११॥

स्वाक्खातो भगवतो धम्मो सन्दिठ्ठीको अकालिको एहिपस्सिको ओपनायिको पच्चत्तं वेदितब्बो विञ्ञूहीति'

अशा या धर्माचे जन्मभर अनुसरण करण्याचा मी निर्धार करीत आहे.

धम्मं यावजीवितं सरणं गच्छामि ।

मी दुसऱ्या कोणाला शरण जाणार नाहीं; दुसऱ्या कोणाचा आधार मी घेणार नाहीं; 'बुध्दधर्मच माझा एकमेव आधार आहे. ह्या सत्य उच्चारानें माझें जय मंगल होवो ॥१॥

नत्थि मे सरणं अञ्ञं, धम्मो मे सरणं वरं ।
एतेन सच्चवज्जेन, होतु मे जयमंगलं ॥१॥

सर्व दृष्टींनीं श्रेष्ठ असलेल्या ह्या बुध्द धर्माला मी मस्तक नम्र करून वंदना करतों. धर्मासंबंधीं माझ्याकडून कांहीं दोष घडला असेल, तर तो धर्म त्याबद्दल मला क्षमा करो ॥२॥

उत्तमंगेन वन्दे' हं धम्मं च, तिविधं वरं ।
धम्मे यो खलितो दोसो, धम्मो खमतु तं ममं ॥२॥

ह्या लोकीं जीं निरनिराळीं अनेक रत्नें आहेत, त्यापैकीं एकानेंही बुध्द धर्माची बरोबरी केली जाणार नाहीं-ह्यामुळें माझें कल्याण होवो ॥३॥

यं किंचि रतनं लोके, विज्जति विविधा पुथु ।
रतनं धम्मसमं नत्थि, तस्मा सोत्थि भवन्तु मे ॥३॥

हा बुध्द धर्म एक असा सरळ मार्ग आहे कीं जो शांतिकारक, उत्तम मार्गाकडे घेऊन जाणारा अष्टांगांनी युक्त तसेंच लोकांना सुख देणारा आहे. त्या धर्माला मी नमस्कार करती ॥४॥

अष्टुङ्गिको अरियपथो जनानं,
मोक्खप्पवेसो उजुको' व मग्गो।
धम्मो अयं सन्तिकरो पणीतो,
निय्यानिको तं पणमामि धम्मं ॥४॥

मराठी भाषांतर–

३. संघ वंदना

भगवंताचा शिष्यसंघ सन्मार्गावर आरूढ आहे. भगवंताचा शिष्यसंघ सरळ मार्गावर आरूढ आहे. भगवंताचा शिष्यसंघ ज्ञानाच्या मार्गावर आरूढ आहे. भगवंताचा शिष्यसंघ उत्तम मार्गावर आरूढ आहे. भगवंताचा शिष्यसंघ अशा नररलांचा आहे कीं ज्यानीं वरील चारी जाड्या व आठ संतपदांची प्राप्ती करून घेतली आहे. हा संघ म्हणजे निमंत्रण देण्यास पात्र, स्वागत करण्यास योग्य, दक्षिणा देण्यास योगय, तसेंच जगांत सर्वश्रेष्ठ पुण्यक्षेत्रमय आहे. असा हा संघ नमस्कार करण्यास योग्य आहे. मी जन्मभर अशा संघाचें अनुसरण करीत आहें.

मला दुसरा कशाचाही आधार नहीं. बुध्दाचा शिष्यसंघच माझा सर्वश्रेष्ठ आधार आहे. ह्या सत्य वचनाने माझें जयमंगल होवो ।।१।।

तिन्ही प्रकारांनी श्रेष्ठ असलेल्या ह्या संघाला मी मस्तक वांकवून प्रणाम करतों. संघासंबंधीं जर माझ्याकडून कांहीं दोष घडला असेल तर तो संघ मला त्याबद्दल क्षमा करो ।।२।।

ह्या लोकीं जीं निरनिराळीं अनेक रत्नें आहेत, त्यापैकीं एकाच्यानेंही संघाची बरोबरी होणार नाहीं. त्याच्यामुळें माझें कल्याण होवो ।।३।।

संघ विशुध्द, श्रेष्ठ, दक्षिणा देण्यास योंय, शत इंद्रियांचा, सर्व प्रकारच्या मलापासून अलिप्त, अनेक गुणांनी युक्त तसाच निष्पाप आहे. अशा ह्या संघाला मी प्रणाम करतों ।।४।।

मूळ पाली

३. संघ वंदना।

सुपटिपन्नो भगवतो सावकसंघी, उजुपटिपन्नो भगवतो सावकसंघो, ञायपटिपन्नो भगवतो सावकसंघो, सामीचिपटिन्नो भगवतो सावकसंघो, यदिदं चत्तारि पुरिस–युगानि, अट्ठ पुरिस–पुग्गला, एस भगवतो सावकसंघो, आहुणेय्यो, पाहुणेय्यो, दक्खिणेय्यो, अञ्जलि–करणीयो अनुत्तरं पुञ्ञक्खेत्त लोकस्साति।

संघं याव जीवितं सरणं गच्छामि।
नत्थि मे सरणं अञ्ञं, संघो में सरणं वरं।
एतेन सच्चवज्जेन, होतु मे जयमंगलं ।।१।।

उत्तमेगन बन्दे' हे, संघं च तिविधोत्तमं।
संघे यो खलितो दोसो, संघो खमतु तं ममं ।।२।।

यं किंचि रतनं लोके, विज्जति विविधुं पुथु।
रतनं संघसमं नत्थि, तस्मा सोत्थि भवन्तु मे ।।३।।

संघो विसुध्दो वरदक्खिणेय्यो,
सन्तिन्द्रियो सब्बमलप्पहिनो।
गुणेहि नेकेहि समिध्दिपत्तो,
अनासवो तं पणमामि संघं ।।४।।

मराठी भाषांतर –

पूजा

मुदींद्राच्या श्रीपादकमलांची पूजा मी ह्या सुंदर, सुगंधी, दोरा घातलल्या फुलांच्या हारानें करितों ।।१।।

ह्या कुसुमांनींमी बुध्दाला पूजितो.ह्या पुण्यानेंमला निर्वाण प्राप्त होईल. हें फूल जसें कोमेजतें तसें माझें शरीर निवाशाकडे जाईल. ।।२।।

अंधाराचा नाश करणाऱ्या, दाट आणि चक्क प्रकाश देणाऱ्या ह्या दिव्यानें अज्ञानांधकाराचा नाश करणाऱ्या त्रिलोक्यदीप बुध्दाची मी पूजा करितों. अनेक प्रकारचीं सुगंधी द्रव्यें मिसळलेल्या ह्या गंधानें मी ज्याचें शरीर व मुख सुगंधी आहेत अशा तथागताची पूजा करितों ।।३।।.

पूजा

बुध्द धर्म व संघ ह्यांना–लंका, जंबुद्विप, स्वर्गलोक, नागलोक, ह्यांमधील स्तूपांमधून बुध्दाच्या शरीरांतील जितके अवशेष स्थापित आहेत, त्या सर्वांना मी प्रणाम करतों ।।४।।.

सगळया दाही दिशांमधून जितकीं बुद्वाचीं रूपें आहेत, तसेच बुध्दाच्या शरीराचे केश वगैरे अवशेष स्थापिलेले आहेत त्या सर्वांना मी नमस्कार करतो. ।।५।।

सर्व ठिकाणीं वसविलेल्या चैत्यांना, बुध्दशरीरच्या अवशेषांना, बोधिवृक्षाला मी वंदन करितों. हीं सदैव बुध्दाचींच रूपें आहेत. ।।६।।

मूळ पाली–

पूजा

वण्ण – गन्ध – गुणोपेतं यं तं कुसुमसन्ततिं।
पूजयामि मुनिन्दस्स, सिरीपादसरारुहे ।।१।।

पूजेमि बुध्दं कुसुमेन' नेन पुञ्ञेन मेतेन
लभमि मोक्खं
पुप्फं मिलायति यथा इदं मे, कायो तथा याति
विनाससभावं ।।२।।

घनसारप्पदित्तेन, दिपेन तमधंसिना।
तिलोकदीपं सम्बुध्दं, पूलयामि तमोनुदं।
सुगंधि–काय–वदनं, अनन्त–गुण–गंधिना।
सुर्गधिना' हं गन्धेन, पूजयामि तथागतं ।।३।।

बुध्दं धम्मं च संघं सुगततनुभवा धातवो धातुगब्मे।
लंकायं जम्बुदीपे तिदसपुरवरे नागलोके च थूपे ।।४।।

सब्बे बुध्दस्स बिम्बे सकलदसदिसे केसलोमादिधातुं वंदे।
सब्बेपि बुध्दं दसवलतनुजं बोधीचेत्यं नमामि ।।५।।

वन्दामि चेमियं सब्बं सब्बठानेसु पतिठ्ठतं।
सारीरिक–धातु महाबोधिं बुध्द–रूपं सकलं
सदा ।।६।।

मराठी भाषांतर –

सर्व सुख गाथा

सारे प्राणी सुखी होवोत, सर्वांचे कल्याण होवो. सर्वांना हिताचा मार्ग सापडो, कोणालाही दु:ख न होवो ।।१।।

जीं भूतें (मृतात्मे) पृथ्वीवरून किंवा अंतरीक्षांतूनयेथें जमलीं आहेत तीं सर्व भूतें समाधानी होवोत आणि लक्ष देऊन बोलणें ऐकोत ।।२।।

म्हणून सर्व भूतांनो ऐका, मानवी प्रजेवर प्रेम करा. जे तुमच्या हिताकरीतां अहो रात्र आपला बळी देतात त्यांचे जागरूकपणें रक्षण करा. ।।३।।

मूळ पाली–

सब्बसुखगाथा

सब्बे सत्ता सुखी होन्तु, सब्बे होन्तु च खेमिनी।
सब्बे भद्राणि पस्सन्तु, मा कञ्चि दुक्खमागमा ।।१।।

यानी' ध भूतानी समागतानि भुम्मानि वा
यानि व अन्तलिखे।
सव्बेव भूता सुमना भवन्तु अथों'पि सक्कच्च
सुणन्तु भासितं ।।२।।

तस्मा हि भूता निसामेथ सब्वे मेत्तं करोथ मानुसिया
पजाय।
दिवा च रत्तो च हरन्ति ये बलिं, तस्मा हि ने रक्खथ
अप्पमत्ता ।।३।।

मराठी भाषांतर –

धर्म पालन गाथा

कोणतेहि पाप न करणें, पुण्य संपादणें,
स्वचित्ताची शुध्दी करणें, हें बुध्दाचे सांगणें ।।१।।

चांगल्या प्रकारें धर्म आचरावा, वाईट प्रकारें नाहीं.
या लोकीं आणि परलोकीं धर्मचारी सुखानें
झोप घेतो ।।२।।

पुष्कळ बोलण्यानें धर्मधर होत नसतो. जो थोडकें
शिकून धर्माचा प्रत्यक्ष अनुभव घेतो आणि धर्माची
हेळसांड करीत नाहीं तोच 'धर्मधर' होतो ।।३।।

मूळ पाली–

धम्मपालनगाथा

सब्बपापस्स अकरणं कुसलस्स उपसम्पदा।
सचित्तपरियोदपनं एतं बुध्दान सासनं ।।१।।

धम्मं चरे सुचरितं न तं दुच्चरितं चरे।
धम्मचारी सुखं सेति अस्मिं लोके परम्हि च ।।२।।

न तावता धम्मधरो यावता बहु भासति।
यो, च अप्पम्पि सुत्वान धम्मं कायेन पस्सति।
स वे धम्मधरो होती यो धम्मं न प्पमज्जति ।।३।।

मराठी भाषांतर – **मूळ पाली–**

रतन सुत्त

जे भूमिगत किंवा अन्तरिक्षांतील प्राणी ये थें जमले असतील त्यांना मी निवंती करतो कीं, आपण तथागताला (बुध्दाला) नमस्कार करूं; येणेंकरून तुमचें कल्याण होईल. ।।१।।

यानीध भूतानि समागतानि। भुम्मानि वा यानि' व अन्तळिखे । तथागतं देवमनुस्सपूजितं । बुद्धं नमस्साम सुवत्थि होतु ।।१।।

जे भूमिगत किंवा अन्तरिक्षांतील प्राणी ये थें जमले असतील त्यांना मी विनंती करतो कीं, ज्याला सर्व मनुष्य आणि देवहि पूज्य मानतात. त्या तथागताच्या धर्माला आपण नमस्कार करूं; येणेंकरून तुमचें कल्याण होईल. ।।२।।

यानीध भूतानि समागतानि। भुम्मानि वा यानि' व अन्तळिखे । तथागतं देवमनुस्सपूजितं । धम्मं नमस्साम सुवत्थि होतु ।।२।।

जे भूमिगत किंवा अन्तरिक्षांतील प्राणी येथें जमले असतील, त्यांना मी असें म्हणतों कीं, ज्याला सर्व मनुष्य आणि देवहि पुजतात त्या तथागताच्या संघाला मनस्कार करूं; येणेंकरून आमचें कल्याण होईल. ।।३।।

यानीध भूतानि समागतानि। भुम्मानि यानि' व अन्तळिखे । तथागतं देवमनुस्सपूजितं । संघं मनस्साम सुवत्थि होतू ति ।।३।।

भूमिगत किंवा अन्तरिक्षांतील जे प्राणी येथें जमलें असतील ते सर्व प्राणी आनंदित होवोत, आणि हें सुभाषित आदरपूर्वक ऐकोत ।।४।।

यानीध भूतानि समागतानि। भुम्मानि वा यानि' व अन्तळिखे। सब्बे च भूता सुमना भवन्तु अथो च

म्हणून हे सर्व प्राण्यांनो, हें ऐका. मनुष्यजातीवर प्रेम करा.रात्रंदिवस मनुष्य तुमची जोपासना करतात. म्हणून त्यांचे तुम्ही सावधानपणें रक्षण करा.।।५।।

तस्मा हि भुता निसामेथ सब्बे। मेत्तं करोथ मानुसिया पजाय। दिवा च रत्तो च हरन्ति ये बलिं। तस्मा हि ने रक्खथ अप्पत्ता ।।५।।

इह किंवा परलोकी जें धन असेल, किंवा स्वर्गंति जें अत्तम रत्न असेल, तें आमच्या तथागताच्या तोडीचें अरणार नाहीं. बुध्दाचें ठायीं वसणारें हैं उत्तम रत्न आहे. ह्या रत्नाचें स्मरण केल्यानें तुमचें कल्याण होईल. ।।६।।

यं किञ्चि वित्तं इध वा हुरं वा। सग्गेसु वा यं रतनं पणीतं न नो असं अत्थि तथागतेन। इदं पि बुद्धे रतनं पणीतं। एतेन सच्चेन सुबत्थि होतु ।।६।।

ज्या निश्चल मनाच्या शाक्यमुनीनें तृष्णाक्षयमय, विरागमय, अमर असा जो उत्तम धर्म जाणला, त्याच्यासारखा दुसरा नाहीं. धर्माचे ठायी वसणारे हें उत्तम रत्न आहे. ह्या रत्नाचें स्मरण केल्यानें तुमचें कल्याण होईल. ।।७।।

स्वयं विरागं अमतं पणीतं। यदज्झगा सक्यमुनी समाहितो न तेन धम्मेन समत्थि किञ्चि। इदं पि धम्मे रतनं पणीतं एतेन सच्चेन सुवत्थि होतु ।।७।।

मराठी भाषांतर –

ज्या शुध्द समाधीची बुध्दश्रेष्ठानेंप्रशंसा केली. जिला ताबडतोब फळ देणारी म्हणतात, त्या समाधी सारखी दुसरी नाहीं. धर्माचे ठायीं वसणों हें उत्तम रत्न आहे. ह्या रत्नाचें रमरण केल्यानें तुमचें कल्याण होईल ।।८।।

सज्जनांना पसंत ज्या आठ' व्यक्ति, ज्यांच्या चार जोड्या होतात. ते सुगताचे श्रावक पूजनीय होत; त्यांग दिलेलें दान महत्फलदायक होतें, संघाचे ठायीं वसणारें हें उत्तम रत्न आहे. ह्या रत्नाचे स्मरण केल्यानें तुमचें कल्याण होईल. ।।९।।

जे सर्वस्वाचा त्याग करून दृढ माननें गौतमाच्या पंथांत प्रवेश करतात, ते प्राप्तव्य प्राप्त करून आणि अमृताचें अवगाहन करून अनायासें मिळविलेल्या शांतीचा उपयोग घेतात. संघाचे ठायी वसणारें हें उत्तम रत्न आहे. ह्या रत्नाचें स्मरण केल्यानें तुमचें कल्याण होईल. ।।१०।।

नगरद्वारासमोर पृथ्वींत (खोल रोवून) उभारलेला स्तम्भ जसा चारही बाजूंच्या वा:यांनीं हालत नाहीं. तसा जो चार आर्यसत्यें विचारपूर्वक जाणतो तो सत्त्यपुरूष आहे. असें मीं म्हणतों. संघाचे ठायीं वसणारें हें उत्तम रत्न आहे. ह्या रत्नाचें स्मरण केल्यानें तुमचें कल्याण होईल. ।।११।।

जे गंभर-प्रज्ञानें (बुध्दानें) उत्तम रितीनें उपदेशिलेल्या चार आर्यसत्यांची भावना करतात. ते जरी कितीहि बेसावधपणें वागले तरी आठवा जन्म घेत नाहींत. संघाचे ठायीं वसणारें हेउत्तम रत्न आहे. ह्या रत्नाचें रमरण केल्यानें तुमचें कल्याण होईल. ।।१२।।

मूळ पाली–

यं बुध्दसेट्ठो परिवण्णयि सुर्चि,
समाधिमानन्तरिकञ्ञमाहु।
समाधितो तेन समो न विज्जति, इदंऽपि धम्मे रतनं पणीतं।
एतेन सच्चेन सुवत्थि होतु ।।८।।

ये पुग्गला अठ्ठ सतं तसत्था। चत्तारि युगानि होन्ति।
ते दक्खिणेय्या सुगतस्स सावका। एतेसु दिन्नानि कहप्फलानि।
इदं ऽ म्पि संघे रतनं पणीतं। एतेन सच्चेन सुवत्थि होतु ।।९।।

ये सुप्पयुत्ता मनसा दळहेन। निक्कामिनो गोतमसासनम्हि।
ते पत्तिपत्ता अमतं विगय्ह। लध्दा मुधा निब्बुतिं भुञ्जमाना।
इदं ऽ पि संघे रतनं पणीतं। एतेन सच्चेन सुवत्थि होतु ।।१०।।

यथिन्दखीलो पठविं सितोसीया चतुब्भि वातेहि असम्पकम्पियो।
तथ्पमं सप्पुरिसं वदमि यो अरियसच्चानि अवेच्च पस्सति।
इदं ऽ पि संघे रतनं पणीतं। एतेन सच्चेन सुवत्थि होतु ।।११।।

ये अरियसच्चानि विभावयन्ति गंभीरपञ्ञेन सुदेसितानि।
किञ्चापि ते होन्ति भुसप्पमत्ता। न ते भवं अट्ठमं आदियन्ति।
इदं ऽ पि संघे रतनं पणीतं। एतेन सच्चेन सुवत्थि होतु ।।१२।।

मराठी भाषांतर –

सम्यक् दृष्टी प्राप्त झाल्याबरोबर तो (वरच्या पैकीं एक) दहात्मदृष्टि, कुशंका व व्रत उपासासारख्या एखाद्या गोष्टीवर असलेला विश्वास. या तीन गोष्टी सोडून देतो. चार दुर्गतींपासून मुक्त होतो व सहा गोष्टी त्याच्या हातून घडणें असंभवनीय होतें. संघाचे ठायीं वसणारें हें उत्तम रत्न आहे. ह्या रत्नाचें स्मरण केल्यानें तुमचें कल्याण होईल. ।।१३।।

जर त्याच्या कडून कोयेनें, वाचेनें किंया मनानें कांहीं पाप घडेल, तर तें तो कदापि झांकून ठेवणार नाहीं. असलें कृत्य (निर्वाण) पद ज्यानें पाहिलें आहे. अशाच्या हातून होणें शक्य नाहीं. संघाचें ठायीं असलेलें हें उत्तम रत्न आहे. ह्या रत्नाचें स्मरण केल्यानें तुमचें कल्याण होईल. ।।१४।।

उन्हाळयाच्या पहिल्या महिन्यांत जसा एखादा वनगल्म साग्र प्रफुल्लित व्हावा, तद्वत् बुद्धानें निर्वाणगामी परमश्रेष्ठ धर्म लोकहितार्थ उपदेशिला. बुध्दाचें ठायीं असलेलें हें उत्तम रत्न आहे. ह्या रत्नाचें स्मरण केल्यानें तुमचें कल्याण होईल. ।।१५।।

श्रेष्ठ, श्रेष्ठज्ञ, श्रेष्ठद, श्रेष्ठ आणणारा, अनुत्तर अशा बुध्दानें श्रेष्ठ धर्म उपदेशिला आहे. बुध्दाचे ठायीं असलेलें हें उत्तम रत्न आहे. ह्या रत्नाचें स्मरण केल्यानें तुमचें कल्याण होईल. ।।१६।।

ज्याचें जुनें कर्म क्षीण झालें आहे व नवें उत्पन्न होत नाहीं, जे भावी जन्माविषयी निरपेक्ष, ते क्षीणबीज आणि उत्पत्तिच्छन्द विरहित धीर पुरुष ह्या प्रदीपाप्रमाणें निर्वाण पावतात. संघाचे टायीं असलेलें हें उत्तम रत्न आहे. ह्या रत्नाचें स्मरणकेल्यानें तुमचें कल्याण होईल. ।।१७।।

मूळ पाली–

सहावऽ रस दस्सनसंपदाय, तयस्सु धम्मा जहिता भवन्ति।
सक्कायदिट्ठि विचिकिच्छितं च सीलब्बतंया ऽ पि यदात्थि किञ्चि।
चतूहपायेहि च विष्पमुत्तो। छ चभिठानानि अभब्बो, कातुं।
इदं ऽ पि संघे रतनं पणीतं। एतेन सच्चेन सुवत्थि होतु ।।१३।।

किञ्वापि सो काम्मं करोति पापकं, कायेन वाचाउद चेतसा वा।
अभब्बो सो तस्य पटिच्छदाय, अभब्बता दिट्ठपदस्स वुत्ता।
इदं ऽ पि संघे रतनं पणीतं। एतेन सच्चेन सुवत्थि होतु ।।१४।।

वनप्पगुम्बे यथा फुस्सितग्गे, गिम्हानमासे पठमस्मि गिम्हे।
तथूपमं धम्मवरं देसयि, निब्बानगार्मि परमं हिताय।
इदं ऽ पि बुध्दे रतनं पणीतं। एतेन सच्चेन सुवत्थि होतु ।।१५।।

वरो, वरञ्ञू, वरदो, वरांहरो, अनुत्तरो धम्मवरं अदेसयि।
इदं ऽ पि बुध्दे रतनं पणीतं। एतेन सच्चेन सुवत्थि होतु ।।१६।।

खीणं पुराणं नवं नत्थि सभवं, विरतचित्ता आयतिके भवस्मि
तेखीणबीजा अविरूळिहछन्दो, निब्बन्ति धीरा यथा ऽ यं पदीपो.
इदं ऽ पि संघे रतनं पणीतं, एतेन सच्चेन सुवत्थि होतु ।।१७।।

जप

ओम मणि पद्मे हुं।

बौध्द पूजा पाठ

१९९८

शासकीय फोटाझिंको मुद्रणालय पुणे - ४११००१